दैनिक
लक्ष महाराष्ट्र
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...
www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com RNI No.MAHMAR/2019/79184
धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ५ वे | अंक : १३७ वा | शुक्रवार दि. २२ मार्च २०२४ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ४

मुंबई, इंदौर, पुणे, अहमदाबाद, कोल्हापूर, नागपूर २X१ स्लिपर कोच AC व Non.AC
पार्सल सेवा व रिटर्न बुकींग उपलब्ध
न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स्, धुळे
२X२ सिटींग लक्झरी बस. शैक्षणिक सहलीकरिता व लग्न समारंभाकरिता बस योग्य दरात भाड्याने मिळेल.

संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

न्यूज कॉलम

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक

दिल्ली । लोकसभा निवडणुकीपूर्वी आम आदमी पक्षाला मोठा धक्का बसलाय. ईडीच्या टीमने दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक केलीय. अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) पथकाने आधी त्याच्या घराची झडती घेतली आणि नंतर त्याची चौकशी केली, यानंतर तपास यंत्रणेने त्यांना अटक केली. दिल्ली दारू घोटाळ्याशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात ईडीने ही अटकेची कारवाई केलीय. दरम्यान आज ईडीचे अधिकारी शोध वॉरंट घेऊन तपास यंत्रणेचे पथक केजरीवाल यांच्या घरी पोहोचले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी त्याच्या घराची झडती घेतली पीएमएलएच्या कलम ५० अंतर्गत जबाब नोंदवण्यात आला त्यानंतर त्यांना अटक करण्यात आलीय.

जि. प. सीईओपदी नरवाडे यांची नियुक्ती

धुळे । जिल्हा परिषदेचे सीईओ शुभम गुप्ता यांची जळगाव जिल्हा विशाल नरवाडे परिषदेत बदली झाली. त्यांच्या जागी बुलडाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी विशाल नरवाडे यांची नियुक्ती झाली आहे. अपर मुख्य सचिव नितीन गद्रे यांनी मंगळवारी (ता. १९) सायंकाळनंतर बदलीचे आदेश काढले. श्री. गुप्ता यांनी नवीन सीईओ नरवाडे यांच्याकडे पदभार द्यावा, असे आदेशात म्हटले आहे. सीईओ गुप्ता यांच्याविरोधात १३ मार्चच्या सर्वसाधारण सभेत सदस्यांनी अविश्वास प्रस्ताव मांडला होता. श्री. गुप्ता पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता निर्णय घेतात, असा आरोप करीत अविश्वास प्रस्ताव मंजूर झाला होता. जिल्हा परिषदेत भाजपची सत्ता आल्यानंतर प्रथमच प्रमुख अधिकाऱ्याच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव मंजूर झाला.

धुळे मनपा करवाढी विरोधात उच्च न्यायालयाच्या खंडपीठात जनहित याचिका दाखल

धुळ्यात मनपाच्या पठाणी आकारणी विरोधात रोष

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

शहरातील भडकलेला ज्वलंत आणि जिव्हाळ्याचा प्रश्न बनलेल्या पठाणी स्वरूपातील घरपट्टी आकारणी आणि वसुलीविरोधात माजी नगराध्यक्ष संजय जाधव यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात धाव घेतली आहे. त्यांची जनहित याचिका खंडपीठाने दाखल करून घेतली आहे. महापालिकेच्या पठाणी स्वरूपातील घरपट्टी आकारणी व वसुलीविरोधात धुळेकरांमध्ये तीव्र रोष आहे. शहर विकास प्रक्रियेत दमछाक होणाऱ्या महापालिकेने पुरेशा सोयी-सुविधा न पुरविता केलेल्या जाचक करवाढीविरोधात सर्वच पक्षांमध्येही खदखद आहे.

श्री. जाधव यांनी सांगितले, की गेल्या काही महिन्यांपासून महापालिका हद्दीतील रहिवाशांना नवीन घरपट्टी अर्थात मालमत्ता करवाढीच्या नावाखाली चुकीच्या पद्धतीने आकारणी, तसेच काही मालमत्ताधारकांना सरासरी चारपट, तर काहींना ९०/१० पटीने वाढीव दराने वसुली बिले पाठविलेली आहेत. त्यावर सुनावणीची केवळ औपचारिकता पूर्ण करून घेतली जात आहे. कोणत्याही प्रकारे नियमानुसार दर कमी केले गेलेले नाहीत. त्यामुळे स्वत: महापालिका व शासनाच्या नगरविकास विभागाविरोधात औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल केली आहे. कोणत्याही स्थितीत बेकायदेशीरपणे केलेल्या घरपट्टी वाढीविरोधात असलेले सर्व पुरावे औरंगाबाद खंडपीठात सादर करून धुळेकरांवर लादलेल्या सुलतानी करवाढीचा बोजा उतरविण्यासाठी लढा सुरू केला आहे. हापालिकेने वाढीव घरपट्टी आकारणीपूर्वी झोननिहाय व बांधकाम वर्षनिहाय दरपत्रक ठरवून तशी शासनाची मंजुरी घेतली पाहिजे होती; परंतु तसे न करता केवळ २०१५/९६ च्या एका ठरावाच्या आधारे प्रशासकीय स्तरावरूनच चुकीचा अर्थ लावत बेकायदेशीरपणे ही आकारणी केलेली आहे.ज्यांचे ग्राउंड फ्लोअरला जुने बांधकाम आहे व त्यात कोणताही बदल नसेल, मात्र वरचा मजला नवीन बांधला असेल तर केवळ वरच्या मजल्यालाच आजच्या दराने आकारणी केली पाहिजे होती; परंतु तसे न करता महापालिकेने ग्राउंड फ्लोअरपासून सरसकट आजच्या दराने अवाजवी वाढीव मालमत्ता कर आकारणी केली असून, ती पूर्णतः चुकीची आहे. महापालिका अधिनियमात घसाऱ्याबाबत कुठलीही तरतूद नसताना काही नागरिकांना सुनावणीची केवळ औपचारिकता पूर्ण करून नंतर घसाऱ्याच्या नावाखाली किरकोळ रक्कम कमी करून मोठ्या प्रमाणावर भुर्दंड जसाचा तसाच ठेवलेला आहे. यात दिशाभूल करून जास्तीचीच बिले दिली जात आहेत.

याचिकेतील मागणी

त्याचप्रमाणे १९९६ च्या शासन परिपत्रकात स्पष्टपणे आदेश आहेत की जुन्या घरांना दामदुपटीपेक्षा मालमत्ता कर आकारणी करता येणार नाही. म्हणूनच शासनाकडून योग्य दरपत्रकास मंजुरी घेतल्यानंतरच धुळेकरांना नवीन करासंबंधी दराची आकारणी करावी, अशी मागणी केली आहे. केवळ महापालिकेचे उत्पन्नवाढीसाठी नागरिकांची लूट करणे ही पूर्णतः बेकायदेशीर प्रक्रिया आहे. यासाठी ज्या सनदशीर लढ्याची आवश्यकता होती आणि खऱ्या अर्थाने न्याय मिळू शकेल तेथे जनहित याचिका दाखल केली आहे. धुळेकरांना अशा अन्यायी प्रक्रियेतून बाहेर काढण्यासाठी ताकदीने लढा देण्याची तयारी आहे, तसेच न्यायासाठी सबळ पुरावे सादर केले आहेत, असे याचिकाकर्ते श्री. जाधव यांनी सांगितले.

कैलास चौधरींनी काढली अनिल गोटेंची लायकी

गोटेंच्या आरोपांना चौधरींकडून जोरदार प्रत्युत्तर

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

बुधवार दिनांक २० मार्च रोजी धुळे शहराचे माजी आ. अनिल गोटेंनी पत्रकार परिषद घेऊन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर सडकून टीका करताना त्यांच्या गटाच्या नेत्याची ओसाडगावचा जहागीरदार, पुण्याचा भामटा संबोधत अक्कल काढली होती. गोटेंच्या पत्रकार परिषदेतील वक्तव्याला अजित पवार गटाचे धुळे शहर जिल्हाध्यक्ष कैलास चौधरी यांनी गुरुवार दिनांक २१ मार्च रोजी पत्रकार परिषदेच्याच माध्यमातून जोरदार उत्तर देत अनिल गोटेंची लायकी काढली. चौधरी म्हणाले की, माजी आ. अनिल गोटेंनी पत्रकार परिषद घेवून रस्त्याच्या कामात कचरा टाकल्याची चुक स्वतःच मान्य केली आहे. उपमुख्यमंत्री अजीत पवार आणि प्रदेश सरचिटणीस इर्शाद जहागिरदार यांच्यावर टिका करणार्या माजी आ.गोटेंचा राष्ट्रवादी निषेध करीत असून गोटेंनी आमच्या नेत्यावर टिका करण्याऐवजी रस्ताकामासोबत स्वतःच्या डोक्यातील कचरा, डेपोतील कचरा टाकू नये असा सल्लाही राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष कैलास चौधरी यांनी दिला आहे. या पत्रकार परिषदेला रविंद्र आघाव, रईस काझी, नरेंद्र अहिरे, सुरेश अहिरे, राहुल पोळ, फरजाना शाह, आदी उपस्थित होते.

कौटुंबिक वादातून जावयानेच सासऱ्याच्या हत्येचा रचला कट

नंदुरबार । लक्ष महाराष्ट्र वृत्त

शहादा येथील राज्य परिवहन महामंडळातील वाहक राजेंद्र मराठे यांच्या हत्येची उकल करण्यात नंदुरबार पोलिसांना यश आले असून कौटुंबिक वादातून जावयानेच सासऱ्याच्या हत्येचा कट रचल्याचे उघड झाले. सुमारे तीन लाख रुपयांची सुपारी हत्येसाठी देण्यात आली होती. या प्रकरणी जावयासह सहा मारेकऱ्यांना शहादा आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी कांदिवली येथून स्थानिक पोलिसांच्या मदतीने ताब्यात घेतले आहे. यातील दोघे विधीसंघर्षग्रस्त बालक वगळता इतर चौघा संशयितांना प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी व्ही. व्ही. निवघेकर यांच्या न्यायालयात हजर केले असता चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

संशयित एका मॉलमधील कर्तनालयात असताना त्यास ताब्यात घेतले. याच गुन्ह्याप्रकरणी पोलिसांनी राजेंद्र मराठे यांचे जावई गोविंद सोनार यालाही ताब्यात घेतले. चौकशीत त्यानेच ही हत्या घडवून आणल्याची कबुली दिली. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या संशयितांमध्ये नीलेश उर्फ तुकाराम पाटील (२५, रा.सालदारनगर, शहादा), जयेश सुतार (३०, मुरली मनोहर कॉलनी, शहादा), लकी भिरारे (१८, भादा, ता.शहादा) यांच्यासह १६ आणि १७ वर्षांच्या दोन बालकांना ताब्यात घेण्यात आले. नंदुरबार येथून मयताचा जावई गोविंद सोनार (३४, गुरुकुलनगर, नंदुरबार) यास पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतल्यानंतर राजेंद्र यांची सुपारी घेऊन हत्या केल्याची कबुली दिली. अटकेनंतर संशयितांना शहादा येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी व्ही.व्ही. निवघेकर यांच्या न्यायालयात हजर केले असता चौघांना २२ मार्चपर्यंत चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली. सदरची कारवाई स्थानिक गुन्हा अन्वेषणचे निरीक्षक किरण खेडकर, शहाद्याचे निरीक्षक शिवाजी बुधवंत, सहायक निरीक्षक दिनेश भदाणे, छगन चव्हाण, प्रवीण कोळी, हवालदार प्रदीप राजपूत, संदीप लांडगे,मुकेश पवार, विकास कापुरे, पुरुषोत्तम सोनार, मोहन ढमढेरे, दिनकर चव्हाण, भरत उगले, घनश्याम सूर्यवंशी, योगेश थोरात, मेरसिंग वळवी, योगेश माळी, किरण पावरा, कृष्णा जाधव, रामा वळवी, दीपक न्हावी, शोयब शेख, अभय राजपूत यांच्या पथकाने केली.

धुळे बाजार समितीत बांधलेले अनधिकृत गाळे जमीनदोस्त करा

सामाजिक कार्यकर्त्या प्रभा परदेशींची मनपा आयुक्तांकडे मागणी

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

कृषी उत्पन्न बाजार समीती येथील मनपा आयुक्त यांच्या अधीकार क्षेत्रात, सक्षम प्राधीकरण यांची परवाणगी न घेता तसेच पणन संचालक महाराष्ट्र, पुणे यांची दिशाभूल करून, अनाधीकृत पणे बांधण्यात आलेले औद्योगीग ३० गाळे, दंडात्मक कार्यवाही सह जमीन दोस्त करण्यात यावेत अशी मागणी भारतीय अपराध नियंत्रण परिषदेच्या धुळे जिल्हाध्यक्षा, सामाजिक कार्यकर्त्या प्रभा रामधार परदेशी, ऍड. प्रवीणकुमार परदेशी यांच्यासह इतर गाळेधारकांनी धुळे मनपा आयुक्त अमित दगडे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदन देताना विषयासंदर्भात आयुंक्ताची निवेदनकर्त्यांनी चर्चा केली. या चर्चेला आयुक्तानी सकारात्मक प्रतिसाद दिला. निवेदनात २०/०७/२०२३ रोजीचे सुनील पवार, पणन संचालक महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र, २२/०८/२०२३ आणि ०१/०९/२०२३ रोजीचे नगर रचनाकार धुळे यांच्याशी झालेल्या पत्रव्यवहाराचा संदर्भ देण्यात आला आहे. निवेदनात म्हटले आहे की, उपनिबंधक सहकारी संस्था धुळे, मिलिद मुडावदकर व ईतर आरोपी यांनी स्वत:चा आर्थीक लाभ मिळवण्याच्या दुष्ट हेतुने, शासनाची व सर्वसाधारण व्यापारी बांधवांची फसवणूक केलेली आहे. तक्रारदार यांनी, नगर रचनाकार यांच्या कार्यलयात, धुळे कृषी उत्पन्न बाजार समीती यांनी, ३० व्यापारी गाळे बांधण्यासाठी, सक्षम प्राधीकरण यांचे परवानगीची प्रत याची मागणी केली असता, धुळे कृषी उत्पन्न बाजार समीती यांनी बांधकाम संदर्भात कोणतीही परवानगी घेतलेली नाही असे तक्रारदार यांनालेखी पत्राव्दारे कळविले आहे. त्यामुळे सदर बेकायदेशीर ३० औद्योगीक गाळे दंडात्मक कार्यवाही करून जमीनदोस्त करावे. संबंधीत आरोपी यांच्याविरुद्ध योग्य अशी चोकशी करून कठोर कार्यवाही करावी. कार्यवाहीची एक प्रत तक्रारदार यांना देण्यात यावी अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत. निवेदनावर प्रभा रामधर परदेशी, ऍड. प्रवीणकुमार परदेशी, कैलास चौधरी, अजय जाधव, राकेश संचेती, संजय पाटील, रोहित लुंड, यश सिंधानी, संदीप पाटील, शुभम परदेशी, स्वप्नील माळी यांच्या सह्या आहेत.

धुळे एज्युकेशन सोसायटीच्या जे.आर.सिटी हायस्कूलमध्ये २३ मार्चला दालनाच्या उदघाटनासह व्याख्यानाचं आयोजन

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

धुळे एज्युकेशन सोसायटीच्या जे.आर.सिटी हायस्कूलमध्ये शनिवार दिनाक २३ मार्च रोजी संत मेळा, जनजाती नायक, स्वातंत्र्यवीर अशा तीन दालनांचा उद्घाटन सोहळा मान्यवरांच्या हस्ते संपन्न होत असून याच दिवशी चितळे स्मृती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष रविंद्र बेलपाठक यांनी दिली आहे. जे.आर. सिटी हायस्कूलमध्ये बेलपाठक यांनी गुरुवार दिनांक २१ मार्च रोजी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत बेलपाठक म्हणाले की, संस्थेला १०८ वर्ष पुर्ण होत असून संस्थेच्या माध्यमातून तीन माध्यमिक शाळा, एक कनिष्ठ महाविद्यालय वाणिज्य महाविद्यालय, बी. एड. कॉलेज आणि इंग्रजी माध्यमाची शाळा चालविली जात आहे. रवींद्र बेलपाठक यांच्या संकल्पनेतून गेल्या सहा वर्षांपासून यावर काम सुरु होते. संत मेळा दालनाचे उद्घाटन श्री सखाराम महाराज संस्थानचे प्रसाद महाराज, जनजाती नायक दालनाचे बारीपाडा येथील चैत्राम पवार, देवमोगरा, सातबारा गुजरात येथील श्री याहामोगी माता मंदिर ट्रस्टचे विश्वस्त आणि स्वातंत्र्यवीर दालनाचे उदघाटन अखिल भारतीय धर्म जागरण समन्वयक प्रमुख शरदराव ढोले यांच्या हस्ते शनिवारी २३ मार्चला होणार आहे. या कार्यक्रमासाठी उपस्थित रहावे असे आवाहन रविंद्र बेलपाठक यांनी केले. या पत्रकार परिषदेला संस्थेचे मानद सचिव संतोष अग्रवाल, डॉ.घुगरी, मुख्याध्यापक पावरा उपस्थित होते.

जिल्हा रुग्णालयातील बंद ए.सी., कुलर,पंखे सुरु करा : अमिन पटेल

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

येथील हिरे मेडिकल रूग्णालयात सोनोग्राफी मशिन, ए.सी., कुलर, पंखे बंद अवस्थेत आहेत. परिणामी, रूग्णांना कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यात आता उन्हाळ्याची चाहुल लागली असल्याने रूग्णांना त्रास होवू नये म्हणून ही उपकरणे तात्काळ सुरू करण्यात यावीत, अशी मागणी समाजवादी पार्टी अल्पसंख्याक शहर अध्यक्ष अमीन पटेल यांच्या नेतृत्वात हिरे मेडिकल प्रशासनाला दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

जेणे करून सोनोग्राफी साठी आलेल्या पेशेंन्ट ला कोणत्याही गोष्टीचा त्रास होणार नाही असे नगरसेवक अमीन पटेल यांनी निवेदनात नमूद केले आहे.

चिंचवार ग्रामपंचायत उपसरपंचपदी श्रीमती जनाबाई पाटील बिनविरोध

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

धुळे तालुक्यातील चिंचवार ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी श्रीमती जनाबाई उखा पाटील यांची निवड करण्यात आली. उपसरपंच म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचे प्रतिनिधी म्हणून श्री दाजभाऊ उखा पाटील तसेच ग्रामपंचायत पदाधिकार्यांचा धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

माजी उपसरपंच केसरबाई जिभाऊ पाटील यांचा नियोजित कार्यकाल संपल्यानंतर त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. त्यांनतर चिंचवार ग्रामपंचायत कार्यालयात उपसरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली. त्यात श्रीमती जनाबाई उखा पाटील यांची सर्वानुमते बिनविरोध उपसरपंच म्हणून निवड करण्यात आली. त्याबद्दल यांचे प्रतिनिधी म्हणून श्री दाजभाऊ उखा पाटील तसेच ग्रामपंचायत पदाधिकार्यांचा महाराष्ट्र काँग्रेसचे कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पं.स.चे माजी सभापती भगवान गर्दे,माजी सरपंच सोमनाथ पाटील,सरपंच कदीर पटेल, माजी ग्रा.पं.सदस्य शांतीलाल पाटील, दाजभाऊ पाटील, ग्रा.पं.सदस्य रहिम पटेल,भाऊसाहेब जगताप आदी उपस्थित होते.

राज ठाकरेंची शिंदे, फडणवीसांशी दीड तास चर्चा, लोकसभेच्या २ जागांची मागणी केल्याचा दावा

मुंबई । लक्ष महाराष्ट्र वृत्त

वांद्रे येथील ताज लँड्स हॉटेलमध्ये मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत जवळपास दीड तास बैठक झाली. या बैठकीत मनसेने महायुतीकडे लोकसभेच्या दक्षिण मुंबई व नाशिक या २ जागांची मागणी केल्याची माहिती आहे. यावर शिंदे व फडणवीस यांच्यात धीरगंभीर चर्चा झाली. पण त्यांच्यात यावर एखादा निर्णय झाला किंवा नाही हे स्पष्ट झाले नाही.

सूत्रांच्या माहितीनुसार, दिल्लीत अमित शाह यांच्या बरोबर राज ठाकरेंची जी चर्चा झाली, त्यात मनसेला महायुतीमध्ये सहभागी करुन घेण्याचा विषय राज्यातील महायुतीच्या नेत्यांकडे सोपवण्यात आला आहे. त्यामुळे आजची चर्चा सकारात्मक झाली का? याची उत्सुकता लागली आहे. ताज लँड्सच्या बैठकीनंतर राज ठाकरे आपल्या निवासस्थानी मनसेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करणार आहेत. त्यात महायुतीत जाण्याच्या मुद्यावर एखादा ठोस निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील काही तासांत महाराष्ट्राच्या राजकारणात महत्त्वाच्या घडामोडी घडण्याची शक्यता आहे.

दोन दिवसांपूर्वी राज ठाकरेंची दुसऱ्यांदा दिल्ली दौरा झाला. सोमवारी रात्री दिल्लीत पोहोचलेल्या राज ठाकरेंनी मंगळवारी, त्यांचा मुलगा अमित ठाकरे याच्यासह भाजप नेते अमित शाहांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांमध्ये सुमारे अर्धा तास चर्चाही झाली. मनसे महायुतीत येण्याच्या चर्चांनी यामुळे जोर धरला. मात्र अमित शाहांची भेट झाल्यानंतर राज ठाकरे त्वरित मुंबईत परतले. ना त्यांनी ना भाजपा नेत्यांनी युतीबाबत कोणतेही भाष्य केले. काल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनाही याबद्दल प्रश्न विचारण्यात आला असता, त्यांनी वाट पाहण्याच सल्ला देत, योग्य वेळी सगळं जाहीर करू अशी प्रतिक्रिया दिली. मात्र यामुळे महायुती कशी असेल ? महायुतीत मनसेचं स्थान काय असेल ? मनसेला किती जागा सोडल्या जाणार ? असे अनेक प्रश्न लोकांच्या आणि मनसे नेत्यांच्या मनातही निर्माण झाले आहेत. त्या सर्व प्रश्नांची आज उत्तर मिळतली अशी अपेक्षा आहे.

..तर मनसेला एक जागा

दोन दिवसांपूर्वी मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी दिल्लीत अमित शहा यांची भेट घेतली. सध्या मनसे महायुतीत दाखल होणार असल्याच्या चर्चांनी जोर धरला आहे. या भेटीत अमित शहांनी राज ठाकरेंचा दोन जागां प्रस्ताव फेटाळून एक जागा देणे शक्य असल्याचे आश्र्वासन दिले. आता महायुतीसोबत जायचे की नाही? याचा संपूर्ण निर्णय राज ठाकरेंवर सोडण्यात आला आहे. जर राज ठाकरेंनी महायुतीसोबत जाण्याचे ठरवले, तर शिंदेंना त्यांच्या वाट्याची एक जागा गमवावी लागणार असल्याचे बोलले जात आहे.

धनादेश अनादर प्रकरणी एकाची निर्दोष मुक्तता

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

धनादेशचा अनादर केल्याप्रकरणी एका संशयीताची तीन खटल्यांमधून सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली.

रविकांत शंकर हिरवे (रा. नाशिक) यांनी फिर्यादीस दिलेले तीन धनादेश न वटता त्याचा अनादर होऊन ते परत आले याप्रकरणी फिर्यादी यांनी आरोपी विरूध्द चलनक्षम दस्तऐवज अधिनियमातील कलम १३८ खाली एकूण ३ फौजदारी खटले दाखल केले होते. तीनही फौजदारी प्रकरणातील फिर्यादी आरोपी यांचे वतीने महत्वपूर्ण साक्षीदार तपासण्यात आले. सुनावणीत आरोपीच्या वकीलांनी वादातीत धनादेश आणि रिटर्न मेमोचे वैधतेबाबत कायदेशीर आक्षेप आणि मुद्दे उपस्थित केले. बॅकेचे अधिकारी यांची साक्ष मोलाची ठरली. वादातीत धनादेश आणि रिटर्न मेमो मधील वैधता आणि कायदेशीर त्रुटी बाबत आरोपीतर्फे वकीलांनी युक्तीवाद केला. तीनही प्रकरणी न्यायाधीश जगताप यांनी आरोपीची नुकतीच निर्दोष मुक्तता केली. आरोपीतर्फे ॲड. दिनेश जी. पाटील, ब्रविम वाय. महाले यांनी बाजू मांडली. ॲड. निलेश कुलकर्णी, ॲड. पुजा मोरे यांनी सहकार्य केले.

दक्षिणेची दहशत..!

काँग्रेस, द्रमुक हे 'सनातन धर्माच्या' विरोधी असल्याची टीका करणे, डाव्यांना देशद्रोही लेखणे यांचा उपयोग अजूनतरी झालेला नाही. संघ परिवार भाजपला दक्षिणेत यश मिळवून देईल का? हा प्रश्न आहे. तामिळनाडूतील सालेम येथील जाहीर सभेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ताज्या दक्षिण दौर्याचा समारोप झाला. या वर्षात मोदी यांनी तामिळनाडूला सहा वेळा भेट दिली. गेले पाच दिवस मोदी कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगण, केरळ व तामिळनाडू या दक्षिणेतील राज्यांच्या दौर्यावर होते. भाजपने या सर्व राज्यांत त्यांच्या मिरवणुका व सभांचे आयोजन केले होते. प्रत्येक कार्यक्रमास मोठी गर्दी होईल याची काळजी घेण्यात आली होती. प्रत्येक राज्यात मोदी यांनी काँग्रेस व तेथील विरोधी पक्ष यांच्यावर कडाडून टीका केली. सालेम मधील सभेत त्यांनी काँग्रेस व द्रविड मुन्नेत्र कळघम हे पक्ष एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याचे मत व्यक्त केले. त्याचा नेमका अर्थ समजत नाही. मात्र या राज्यात अखिल भारतीय अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम खेरीज आणखी एक पक्ष आपल्या आघाडीत आणण्यात भाजपला यश आले आहे. पट्टली मक्कल कच्छी हा एस. रामदास यांचा पक्ष अखेर आघाडीत आला आहे. उत्तर तामिळनाडूत पीएमकेला लोकसभेच्या दहा जागा व एक कॅबिनेट मंत्रिपद देण्याचे भाजपने कबूल केले आहे. चालू वर्षाच्या प्रारंभापासून मोदी सतत दक्षिणेतील राज्यांना भेट देत आहेत. प्रत्येक राज्यात महत्त्वाच्या मंदिरांना ते आवर्जून भेट देत असतात. त्याचे कारण अर्थातच आगामी लोकसभा निवडणुका हे आहे. या वर्षाच्या सुरुवातीसच मोदी यांनी तामिळनाडू, लक्षद्वीप व केरळचा दौरा केला. अयोध्येतील राम मंदिराच्या उद्घाटनापूर्वी त्यांनी रामायणाशी संबंधित अनेक ठिकाणे, मंदिरे यांना भेट दिली. धर्मनिरपेक्ष देशाच्या पंतप्रधानांनी इतका उघड धार्मिक दौरा करणे घटनेत बसते की नाही? हा मुद्दा त्यांनी येऊ दिला नाही. कारण या काळात ते या राज्यांत विकासकामांचे उद्घाटन किंवा लोकार्पण करत होते म्हणजे हा दौरा अधिकृत होता. मात्र त्या नंतरही मोदी दक्षिणेत येतच आहेत. लोकसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्या तेव्हाही मोदी दक्षिणेतच होते. जरी दौरा पंतप्रधानांचा असला तरी प्रत्यक्षात ते भाजपचे कार्य करत होते. प्रत्येक राज्यात कोणी मित्र मिळत आहे का याची चाचपणी या काळात होत होती. कर्नाटकात भाजपने संयुक्त जनता दलास बरोबर घेतले आहे. आंध्र प्रदेशात तेलुगु देशमशी युती केली, केरळमध्ये भारत धर्म जन सेना हा मित्र पक्ष आहे. तेलंगणात मात्र भाजपला मित्र मिळालेला नाही. निवडणुका जिंकण्यात चतुर असलेल्या भाजपला दक्षिणी राज्यांत अजूनही यश आलेले नाही. या पाच राज्यांत मिळून लोकसभेच्या १३२ जागा आहेत. येत्या निवडणुकीत ३७० जागा जिंकण्याचे उद्दिष्ट भाजपने ठेवले आहे. त्यासाठी त्यांना दक्षिणेची मदत आवश्यकच आहे. दक्षिणेत सर्वात जास्त ३९ जागा तामिळनाडूत आहेत. गेल्या वेळी 'एनडीए'ने त्या सर्व लढवल्या, मिळाली एक जागा. तीही अण्णा द्रमुकला. केरळमध्ये २० पैकी भाजपला एकही जागा मिळाली नव्हती. कर्नाटकात गेल्या वेळी भाजपने २८ पैकी २५ जागा व तेलंगणात १७ पैकी ४ जागा जिंकल्या होत्या. आता दोन्ही राज्यांत काँग्रेस सत्तेत आहे. त्यामुळे भाजपला दोन्ही राज्यांत मिळून दहा जागा तरी मिळतील की नाही हे सांगता येत नाही. आंध्र प्रदेशात लोकसभेच्या २५ जागा आहेत. गेल्या वेळी भाजपला येथेही एकही जागा मिळाली नव्हती. चंद्राबाबू नायडू यांच्या तेलुगु देशम पक्षाला तीन जागा मिळाल्या होत्या. आता या दोन्ही पक्षांची युती असली तरी सत्तेतील वायएसआर काँग्रेस भाजपवर नाराज आहे. तो या युतीच्या मार्गात अडचणी उभ्या करेल. काँग्रेसचे आव्हानही वाढत आहे. एकूणच दक्षिणेतील पाचही राज्यांत भाजपची स्थिती बिकट आहे. मोदी यांची हमी, हजारो कोटी रुपयांची कथित विकासकामे यांचा उपयोग येथे झाला नाही. धार्मिक ध्रुवीकरणाचा भाजपचा प्रयोग या पाच राज्यांत फारसा यशस्वी झाला नाही. त्यामुळे आता या भागांत कशाच्या आधारे मते मागायची? हा प्रश्न भाजप समोर उभा आहे. देशाच्या उर्वरित भागांत ३७० जागा कशा मिळणार? हाही प्रश्न आहे. एकूणच दक्षिणेतील राज्यांनी भाजपसमोर दहशत निर्माण केली आहे.

दक्षिणेतील हिंदूंना मोदींचा आधार

भारतीय राज्यघटना १९५० साली देशाला बहाल केली गेली. त्यावेळी सर्वधर्मसमभाव अर्थात सेक्युलर हा शब्द त्यात नव्हता. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी त्यांच्या कार्यकाळात सेक्युलर हा शब्द नंतर समाविष्ट केला. देश स्वतंत्र झाला, त्यावेळी पाकिस्तानची निर्मिती ही धर्माच्या आधारावर झाली होती. सेक्युलरची ढाल पुढे करून ७५ वर्षांनंतर भारतात राहणाऱ्या हिंदूंवर सातत्याने अपमानाची वागणूक देण्याचे काम सुरू आहे; परंतु हिंदूंवर होणाऱ्या अन्याय, अत्याचारावर 'ब्र' काढण्याची ताकद मतांच्या लाचारीमुळे तथाकथित सेक्युलर राजकीय पक्षांकडे आजही नाही.

देशाच्या दक्षिण प्रांतात हिंदू देवदेवतांना मानणारा, पूजा-अर्चा करणारा मोठा वर्ग आहे. कन्याकुमारीपासून रामेश्वर येथील प्राचीन देवालये, देशातील सर्वांत श्रीमंत देवस्थान तिरूपती बालाजी अशी अनेक उदाहरणे देता येतील; परंतु दक्षिणेतील हिंदू हा संघटित नसल्याने त्याचा गैरफायदा राजकीय पक्षांनी उठवला. सनातन हिंदू धर्माचा तिरस्कार करणारे परियारचे तत्त्वज्ञान हा गाभा येथील काही राजकीय पक्षांचा आहे. त्यातून डीएमके आणि काँग्रेससारखे पक्ष हे सातत्याने हिंदू धर्माला कमी लेखताना दिसतात.

हिंदूविरोधी बोललो, तरच त्यांना अन्य धर्मियांची मते मिळू शकतात, असा विश्वास वाटत असावा. तोच धागा पकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डीएमके, काँग्रेसवर प्रहार केला आहे. त्यामुळे मोदींच्या रूपाने दक्षिणेतील हिंदू धर्मियांना एवढ्या वर्षांत आपल्या बाजूने बोलणारा आधार लाभला आहे, असे वाटू लागणे स्वाभाविक आहे.

''इंडिया आघाडीचे सदस्य असलेले काँग्रेस आणि डीएमके हे इतर कोणत्याही धर्माचा अपमान करताना आपण पाहिले आहे का?, ते इतर कोणत्याही धर्माविरुद्ध एक शब्दही उच्चारत नाहीत, पण हिंदू धर्माला तुच्छ लेखण्यास एक सेकंदही वाया घालवत नाहीत'', ही बाब तामिळनाडूतील सेलम येथील जाहीर सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निदर्शनास आणून दिली. भारतीय जनता पार्टीचा दबदबा हा उत्तर भारतात आहे. दक्षिण भारतात भाजपाला आगामी लोकसभा निवडणुकीत हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच जागा मिळतील, असे चित्र कर्नाटक विधानसभेतील भाजपा सरकार गमावल्यानंतर उभे करण्यात आले होते. मात्र गेल्या दोन-तीन महिन्यांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दक्षिण भारतावर लक्ष केंद्रित करून अनेक प्रचार रॅली तसेच विकासकामांचा शुभारंभ केला. देशाचा पंतप्रधान आपल्या भावना जाणून घेत आहे, अशी भावना आता दक्षिणेत दृढ होऊ लागली आहे. त्यामुळे २०२४ मध्ये आश्चर्यकारक यश भाजपाला मिळाल्यास कोणाला धक्का बसू नये, अशी परिस्थिती आता निर्माण झाली आहे.

तसे पाहिले, तर भाजपाने २०२४ मधील लोकसभा निवडणुकीसाठी एक व्यूहरचना आखली. यामध्ये देशाची तीन प्रदेशांत विभागणी करून निवडणूक अभियान राबवण्याचे ठरले. तिन्हींची आखणी वेगळी असेल आणि धोरणही पूर्णपणे वेगळे राहील, असे त्यात ठरले होते. पहिला प्रदेश हिंदी पट्ट्यातील १० राज्ये, दुसरा ईशान्य आणि तिसरा दक्षिण भारत आहे. पक्षाने जागांच्या दृष्टीने तीन प्रदेशचा फॉर्म्युला तयार केला. तसेच गुजरात, पंजाब, महाराष्ट्र आणि जम्मू-काश्मीर या चार राज्यांसाठी स्वतंत्र धोरण आखण्यात आले आहे.

गेल्या निवडणुकीत जिंकलेल्या जागांपैकी ८०% जागांवर विजयाचे अंतर वाढवणे. प. बंगाल, बिहार, ओडिशा या राज्यांत जिंकलेल्या जागांची संख्या वाढवणे; तामिळनाडू, केरळ आणि आंध्रमध्ये कमीत-कमी ३० ते जास्तीत-जास्त ७० जागा जिंकणे, एनडीएची व्याप्ती वाढवण्यासाठी दक्षिणेत कनिष्ठ पक्ष बनण्यास हरकत नसणे, दक्षिणेत प्रभावशाली लोकांच्या माध्यमातून हिंदीवादी पक्ष ही प्रतिमा मोडून काढणे, यावर भर देण्यात येत आहे. दक्षिणेत लोकसभेच्या १३० जागा आहेत. येथील अस्मिता 'दक्षिण गौरव' ठेवून काम केले जात आहे. यात सांस्कृतिक व भाषिक मूल्यांचे रक्षण करणे, हिंदूंच्या मागास जातींना प्राधान्य देणे, धर्मांतर-तुष्टीकरण या मुद्द्यांवर प्रहार करणे आदींचा समावेश आहे.

संपूर्ण हिंदी पट्ट्यातच नव्हे, तर ईशान्य आणि पश्चिम भारतात गेल्या दोन लोकसभा निवडणुकांमध्ये भाजपाने शिखर गाठले आहे. यामुळे २०१९ च्या निवडणुकीत भाजपाला ३०३ जागांचा आकडा गाठता आला. अशा परिस्थितीत, २०२४ च्या निवडणुकीसाठी पंतप्रधान मोदींनी ठेवलेले लक्ष्य दक्षिणेकडील राज्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाशिवाय साध्य करणे सोपे नाही, हे ओळखून पंतप्रधान मोदींनी दक्षिणेकडील विशेषत: तामिळनाडू, केरळ आणि तेलंगणा या राज्यांवर लक्ष केंद्रित केल्याचे दिसले. या वर्षी जानेवारीपासून गेल्या तीन महिन्यांत पंतप्रधान मोदी यांनी तामिळनाडूच्या चार दौऱ्यांसह दक्षिणेकडील राज्यांना अर्धा डझनहून अधिक भेटी घेतल्या आहेत. हिंदूंविरोधी भूमिका घेणाऱ्या काँग्रेस आणि तेथील प्रादेशिक पक्षांवर जोरदार हल्ला करण्याची संधी पंतप्रधान मोदी सोडत नाहीत, त्यामुळे देशाच्या राजकारणाच्या पटलावर नवे रंग उगवण्याच्या शक्यता निर्माण झाल्या आहेत.

२०२४ मध्ये भाजपाने लोकसभेच्या ३७० जागा मिळवून एनडीएच्या ४०० जागांचा टप्पा ओलांडण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. दक्षिणेतील हिंदूंना आधार देणारा नेता दृष्टिपथास आल्याने मोदींच्या नेतृत्वाखाली भाजपा दक्षिणेकडील राज्यांमध्ये मोठा राजकीय जनाधार मिळवू शकतो, हे ४ जूनच्या निकालातून स्पष्ट होईल.

बदलते हवामान संपूर्ण सृष्टीसाठी चिंताजनक

जगातील भयावह घटना पहाता बदलत्या हवामानावर नियंत्रण ठेवणे काळाची गरज. जगात महाप्रलय,भुकंप, सुनामी,वनवे लागणे, ज्वालामुखीचा उद्रेक,अवकाळी पाऊस,अती उष्णता,अती थंडी, ग्लेशियर वितळणे, समुद्राची पातळी वाढने किंवा येणाऱ्या नैसर्गिक आपदा याची सुचना यावर नियंत्रण कसे ठेवता येईल व येणाऱ्या नैसर्गिक आपदांची माहिती कशी मिळु शकेल याउद्देश २३ मार्च १९५० ला जागतिक हवामान संस्थेची स्थापना करण्यात आली.यापुर्वी १९२२ ला हवामान शास्त्रज्ञ लुइस फ्राय रिचर्डसन यांनी हवामानाच्या अंदाजाचा शोध लावुन हवामान पहाण्याकरीता सांख्यिकी पध्दत शोधून त्यानुसार काही प्रमाणात हवामान अंदाज वर्तविता येऊ लागले व हवामानाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे काम केले.

हवामान शास्त्रज्ञ लुइस फ्राय रिचर्डसन यांनी लावलेला शोध आज जगाला अत्यंत कारगर आणि गुणकारी सिध्द झाल्याचे आपण पहातो.त्याच अनुषंगाने १९५० ला जागतिक हवामान संस्थेची (डब्लुएमओ) स्थापना करण्यात आली या संस्थेचे मुख्यालय स्वित्झर्लंड येथील जिनेव्हा येथे आहे.यानंतर (डब्लुएमओ) संयुक्त राष्ट्राची (युएन)विषेश संस्था बनली. पहिला जागतिक हवामान दिवस २३ मार्च १९६१ रोजी साजरा करण्यात आला.त्यावेळी ३१ सदस्य देश होते आता या आंतरराष्ट्रीय संघटनेचे १९३ देशांपेक्षा जास्त सदस्य आहेत.

२३ मार्च जागतिक हवामान दीन

पर्यावरणातील वाढते बदल याबद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या अनुषंगाने या दिवसाला अत्यंत महत्व आहे. गेल्या २० वर्षात युद्धजन्य परिस्थिती, वाढते औद्योगिकीकरण, परमाणु परिक्षण, मोठ्या प्रमाणात जंगलतोड इत्यादी अनेक कारणांमुळे हवामानातील बदलाने जगातील पर्यावरणाची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे.कारण आज जगातील पर्यावरण अत्यंत धोकादायक व भयावह स्थितीत येवून ठेपले आहे.यामुळे मानव,पशु-पक्षी व संपूर्ण जीवसृष्टीला मोठा धोका निर्माण झाला आहे.आज जगामध्ये वाढते औद्योगिकीकरण, वायुप्रदूषण, जंगलतोड, युद्धजन्य परिस्थिती,वाढती उष्णता,वाढती लोकसंख्या यामुळे हवामानात रोज वेगवेगळे आमुलाग्र बदल होतांना आपण पहातो. जगात महाप्रलय, सुनामी,भुकंप, ज्वालामुखीचा उद्रेक,अती पाऊस,अती थंडी,अती उष्णता, वणवे लागणे, नैसर्गिक आपत्ती अशा अनेक घटना जगात मानवाच्या अतिरेकामुळे दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे.या येणाऱ्या आपदांची सटीक माहिती हवामान विभाग जगभर देत असते.यामुळे जगातील देश सतर्कता बाळगुन सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पाऊले उचलतात. त्यामुळे आपण समजू शकतो की हवामान खात्याची भुमिका जगासाठी अत्यंत मोलाची आणि महत्त्वाची आहे. आज अत्याधुनिक युगात उपग्रहांच्या (सेटेलाईटच्या) माध्यमातून हवामानातील बदलांचे संकेत हवामान संस्था जगभरातील संपूर्ण देशांना वेळोवेळी देत असते.हवामानातील बदलांचे संकेत लोकांमध्ये जागृता निर्माण करण्याचे काम करीत असते.

रमेश लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)
मो.९९२१६९०७७९

हवामान दिनाचे औचित्य साधून व हवामानातील वाढते बदल व धोका पहाता निसर्गाला संतुलित ठेवणे गरजेचे आहे.याकरीता जगातील संपूर्ण देशांनी हवामानातील मोठ्या प्रमाणात वाढते बदल पहाता आजच्या दिवसाला जास्तीत जास्त वृक्षारोपण करने अत्यंत गरजेचे आहे.यामुळे वाढत्या हवामानातील बदलांवर नियंत्रण ठेवण्यास मोठी मदत होईल. सोबत निसर्ग प्रफुल्लित राहुन संपूर्ण जंगलातील पशु-पक्ष्यांसाठी एक आल्हाददायक वातावरण निर्माण होईल. कारण हवामानाचे संपूर्ण गणित निसर्गावरच अवलंबून आहे.त्यामुळे निसर्ग सुरक्षित रहाला तर हवामान सुध्दा सुरक्षित राहू शकते.याचा फायदा संपूर्ण जगाला व जीवसृष्टीला होईल.

शब्दकोडे-३५५

आडवे शब्द

१. संगीतातील सात स्वर ५. दोन पवित्र नद्यांचे नावे ७. विद्या ९. अरण्य ११. ढगाळ वातावरण १२. चांदी १३. वस्तू तयार करण्यासाठी लागणारे साहित्य, मालमसाला १५. युक्ती १७. फुरसत १८. आपला नसलेला २०. अद्भूत, विचित्र २३. पार्वतीचे एक नाव २५. कारखान्याचा मालक २७. उपहास, टिंगल २८. जेव्हा ३०. घागरा ३२. नेहमी, सदोदित ३३. बांबू ३४. जन्म ३५. देवाण-घेवाण ३७. चुणीदार पट्टी ३८. सुंदर तरुणी ४०. झाडाभोवतीचा कट्टा ४१. ललाट ४३. तुलनेतील साखरेपणा ४४. आनंद ४५. युद्ध ४८. कापड तयार करणाऱ्या कारखान्यातील कामगार ४९. उन्हाळ्यातील त्वचा दुभंगण्याचा रोग ५१. शृंखला, कडी ५२. हडळ, स्त्रीभूत ५४. मातीचा कण ५५. मुलीचा नवरा ५८. उष्टे ६१. घाईघाईत, धावत ६४. हिंदीत चुकीचे ६५. गुजराथी नृत्यप्रकार ६७. लक्ष्मीचे एक नाव ६९. मातृभाषा ७०. लोणी ७१. घरात शिरकाव करणारा सगळ्यात धोकादायक कीटक ७२. त्याप्रमाणे, तसे

उभे शब्द

१. 'काही विशेष नसलेला' किंवा 'सरासरी' या अर्थाने वापरला जाणारा शब्द २. तृण ३. अंत:करण ४. धकधक ६. जाणूनबुजून ७. घागर ८. फायदा १०. राष्ट्रभाषते शेतकरी ११. स्वत:ला १३. व्याजाने कर्ज देणारा १४. उन्हाळा ऋतू १६. दावा १७. मंत्रीमंडळ १९. घराणे २०. टाळता न येणारे २१. तफावत २२. नेत्रसुखद २३. मेहरबानी २४. ठोक! हाण २६. संसद सदस्य २९. धर्मार्थ देणे ३१. गोष्ट, कथा ३३. सोने ३४. मैफिल ३५. पायपासून डोक्यापर्यंत ३६. पहिला ३९. सुसर ४२. मर्यादा ४४. संधी ४५. रंग बदलणारा प्राणी ४६. रात्र ४७. पंक्ती, गाण्याचे चरण ४८. पर्वतकन्या-पार्वतीचे एक नाव ५०. दालचिनी ५१. समुद्र, रत्नाकर ५३. नशीब (हिंदी) ५६. नवरदेवाची आई ५७. प्राणवायूचा अखंड पुरवठा करणारी वनस्पती ५८. नासाडी, नाश (हिंदी) ५९. व्यायाम ६०. रानटी ६१. ऱ्हास, पाडाव ६२. मोठी उथळ ताट ६३. मजबूत, भरभक्कम ६६. फळांतील द्रव ६८. कळस, शेंडा



शब्दकोडे-३५४ चे उत्तर

आडवे उत्तर

१.वर्तमानपत्र ५.अंगाईगीत ९.कल्पक ११.रास्त १२.गल १३.तरतूद १५.कवाड १८.सट १९.बाप २०.नाकावर बोट ठेवणे २३.मालक २४.रवरव २५.साल २६.नाडकर्णी २७.रवि २८.भांग ३०.कसर ३१.चकमक ३३.वडवानल ३५.दमणूक ३८.काणी ३९.रयत ४०.क्षयमास ४२.दाबणे ४३.नर ४५.हलका ४६.खबर ४८.गोदावरी ५०.मका ५१.लीनता ५४.सरासरी ५६.ओबडधोबड ५८.मी ५९.खल ६०.उपासक ६४.तळपाय ६५.अंत ६६.मनमुराद ६८.सलवार ७१.कोळी ७२.गांगायमुना ७४.सदा ७५.महाभारत ७६.दादा ७७.आनन

उभे उत्तर

१.१.वचक २.माकड ३.पराचा कावळा करणे ४.त्रस्त ५.अंग ६.गालबोट ७.गीत ८.तरसणे ९.कद १०.कर्णोपकर्णी १४.तूट १६.वानरविचका १७.आरसा १९.बालक २०.नार २१.बोलभांड २२.ठेचा २३.माड २६.नारद २९.गवाक्ष ३०.कलमा ३२.कणीदार ३३.वतनदार ३४.नयन ३६.महाकाली ३७.करविता ४१.सहकारी ४१अ.दु:ख ४४.रव ४७.बटबटीत ४९.रीस ५०.मसलत ५२.नवस ५३.मधोमध ५५.राख ५७.डळमळीत ६०.उपासना ६१.पायल ६२.कदरदान ६३.परागंदा ६५.अंक ६७.दगा ६९.वासन ७०.दहा ७१.कोर ७३.मुभा

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
नंदुरबार कार्यालय - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

महावितरण अधीक्षक अभियंत्यांसमोर उद्योजकांनी वाचला समस्यांचा पाढा

तातडीने प्रश्न मार्गी लावण्याचे पडळकर यांचे आश्वासन

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

जिल्ह्यातील आणि विशेषतः अंबड, सातपूर तसेच सिन्नर, दिंडोरी आणि इगतपुरी तालुक्यातील उद्योजकांनी महावितरणचे अधीक्षक अभियंता ज्ञानदेव पडळकर यांच्यासमोर विद्युत खात्याच्या समस्यांचा पाढाच वाचला. उद्योजकांच्या समस्यांचे त्वरित निराकरण करावे,असे निर्देश देतांनाच कामचुकारपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांची पडळकर यांनी चांगलीच हजेरी घेतली.

आयमा व निमा यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी आयमा रिक्रिएशन सेंटर (अंबड) येथे वीज मंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत नाशिक जिह्यातील उद्योजकांचे महावितरण विभागाशी संबंधित अडथळे व तक्रारींबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी अंबड, सातपूर, गोंदे, दिंडोरी, शिंदे, पळसे, सिन्नर, मुसळगाव, वाडीव्हरे, इगतपुरी येथील उद्योजकांनी तक्रारींचा पाऊस पडून अधिकाऱ्यांना सळो की पळो करून सोडले. विशेषतः अंबड आणि सातपूरचे उद्योजक आक्रमक दिसले.

व्यासपीठावर निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे, आयमाचे अध्यक्ष ललित बूब, सचिव प्रमोद वाघ, बीओपीपी चेअरमन ज्ञानेश्वर गोपाळे, पॉवर कमिटी चेअरमन रवींद्र झोपे, निमाचे उपाध्यक्ष राजेंद्र अहिरे, सचिव निखिल पांचाळ, महावितरणचे कार्यकारी अभियंता चेतन वाडे व राजाराम डोंगरे, आयमाचे उपाध्यक्ष राजेंद्र पानसरे, उमेश कोठावदे, खजिनदार गोविन्द झा, सहसचिव हर्षद बेळे, दिलीप वाघ, योगेश पाटील, अविनाश मराठे, जगदीश पाटील, मनिष रावळ, राहुल गांगुर्डे, जयंत पगार, कुंदन डरंगे, देवेंद्र विभुते, अजय यादव, विनोद कुंभार, श्वेता चांडक, विरल ठक्कर, मनोज मुळे, दिलीप वाघ, जयप्रकाश जोशी, श्वेता चांडक, संजय देशमुख, कमलेश उशीर, विजय जोशी, जयेश महाले, रणजीत सानप, सुरज आव्हाड आदी होते.

उद्योग जगतासाठी विजेचा पुरवठा अखंडपणे सुरू राहणे गरजेचे असते. परंतु अनेकदा पूर्वसूचना न देता वारंवार विद्युत पुरवठा खंडित करण्यात येतो. शटडाऊनचे प्रकारही घडत असतात. त्यामुळे उत्पादनावर त्याचा परिणाम होऊन आर्थिक हानी होते. फिडरचे ब्रेकर बदलावे, जे डीपी बॉक्स गंजले आहेत ते बदलून नवीन टाकावेत, मनुष्यबळ वाढवावे, मेंटेनन्ससाठी मोठ्या प्रमाणात साहित्य उपलब्ध करून द्यावे तसेच विद्युत पुरवठा विनाखंड सुरू राहावा अशा सूचना उद्योजकांनी केल्यानंतर उद्योजकांच्या न्याय्य मागण्या तातडीने सोडविल्या जातील असे आश्वासन पडळकर यांनी दिले. मराठवाडा, विदर्भाप्रमाणे नाशिक जिल्ह्यातील मागास भागात विजेबाबत सवलती मेळाव्यात अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

दिंडोरी तालुक्यातील उद्योजकांनी पैसे भरूनही कनेक्शन मिळत नाही, सातत्याने विद्युत पुरवठा खंडित होतो आदी तक्रारी केल्या. दिंडोरी तालुक्यातील औद्योगिक वसाहतींसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश पडळकर यांनी दिले. इगतपुरी तालुक्यातील गोंदे आणि वाडीवऱ्हे येथील उद्योजकांनीही आपल्या समस्यांना वाट मोकळी करून दिली. यावेळी गोंदे येथे ५१ केव्हीचा ट्रांसफार्मर बदलण्यात येणार असल्याचे पडळकर म्हणाले. प्रास्ताविकात ललित बूब यांनी उद्योजकांच्या वीज विषयक समस्या मांडून पडळकर यांचे लक्ष वेधून घेतले. वीज हाच उद्योजकांचा आत्मा आहे. त्यामुळे शट डाऊन सारखे प्रकार होणार नाहीत याची काळजी घ्यावी, नव्या सब स्टेशनला गती द्यावी आदी मागण्या केल्या.

अंबड येथे मनुष्यबळ वाढवावे, सातपूरला शून्य शट डाऊन असते मात्र अंबडला सातत्याने शट डाऊन का होते? असा सवाल करून धनंजय बेळे यांनी अंबड येथील महावितरणच्या अकार्यक्षमतेवर बोट ठेवले. यावरून त्यांनी याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना शोकॉज नोटीस बनवण्याची मागणी केली. उद्योजकांच्या वीज विषयक कोणत्याही समस्या तातडीने न सुटल्यास कुणाचीही गाय केली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. जिल्हा न्यायालयाचा निकाल आपल्याला बाजूने लागलेला असतानाही अद्यापपर्यंत आपणास वीज कनेक्शन मिळाले नाही असे अंबडच्या एका उद्योजकाने निदर्शनास आणून दिल्यानंतर या उद्योजकाचा वीज पुरवठा आजच्या आज सुरू न झाल्यास उपोषणास बसण्याचा इशारा निमा व आयमाच्या पदाधिकाऱ्यांनी दिल्यानंतर तातडीने हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन पडळकर यांनी दिले. रवींद्र झोपे, राजेंद्र पानसरे, संदीप भाबड, ज्ञानेश्वर गोपाळे आदींनीही उद्योजकांच्या हिताच्या समस्या मांडल्या. आभार प्रमोद वाघ यांनी मानले.

विद्यार्थ्यांनी सापडलेले २५०० रुपये प्रामाणिकपणे केले परत

लासलगाव। लक्ष महाराष्ट्र वृत्त

प्रामाणिक असणे म्हणजे सत्य असणे.प्रामाणिकपणा म्हणजे आयुष्यभर सत्य बोलण्याचा सराव विकसित करणे.प्रामाणिक व्यक्तीकडे नैतिक चारित्र्य मजबूत असते अशी व्यक्ती विश्वासार्ह असते.शालेय जीवनात प्रत्येकाने प्रामाणिकपणा सर्वोत्तम धोरण आहे हे वाक्य नक्कीच ऐकलेले असते.याच विचारांचा कृतीयुक्त वारसा पुढे नेताना येथील नूतन विद्या प्रसारक मंडळाच्याइंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या युवा सहकाऱ्यांपुढे एक नवीन आदर्श उभा केला आहे.

प्रतीक प्रभाकर होळकर,श्रीतेश शरद लोहोकरे व रेहान अमजद पठाण या विद्यार्थ्यांना शाळेच्या परिसरात २५०० रुपये सापडले,मात्र त्यांनी हे पैसे आपसात वाटून न घेता तातडीने क्रीडा शिक्षक अक्षय आंबेकर यांच्या निदर्शनास आणून दिले व सदरची रक्कम प्राचार्यांकडे प्रामाणिकपणे सुपूर्द केली.शाळेचे विद्यार्थी नेहमीच सापडलेल्या वस्तू व पैसे कार्यालयात जमा करत असतात. शाळेच्या सेविका वंदना आहेर यांनाही एक हजार रुपये सापडले होते तेही त्यांनी प्रामाणिकपणे परत केले.विद्यार्थ्यांनी बालवयातच गिरवलेले प्रामाणिकपणाचे धडे हे इतरांनाही नक्कीच आदर्शवत ठरतील असा विश्वास प्राचार्य सत्तार शेख यांनी व्यक्त केला.

या तीनही विद्यार्थ्यांचे शाळेच्या परिपाठामध्ये पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले. तर संस्थेचे जनरल सेक्रेटरी गोविंदराव होळकर यांनी या विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देऊन हाच प्रामाणिकपणा आयुष्यभर कायम ठेवण्याचा संदेश दिला.विद्यार्थ्यांच्या या प्रामाणिकपणाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य, उपप्राचार्य, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

अहिंसा तसेच सुंदर नाशिक, हरित नाशिकचा संदेश देण्यासाठी 'जीतो अहिंसा रन' ३१ मार्चला

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

जिथे आज संपूर्ण जगात हिंसाचार होत आहे, तिथे अहिंसा हाच एकमेव उपाय मानला जातो, हे निश्चितच खरे आहे. हिंसा ही केवळ शारीरिक नसून ती मानसिकही असू शकते आणि ती केवळ मानवजातीसाठीच नाही तर प्रत्येक जीवाशी असू शकते. प्रेम, क्षमा, त्याग ही सर्व अहिंसेचीच रूपे आहेत आणि जगाला शांती आणि अहिंसेचा संदेश तसेच सुंदर नाशिक हरित नाशिकचा संदेश प्रसारित करण्यासाठी, दरवर्षीप्रमाणे यंदाही जीतो द्वारे अहिंसा रनच्या रूपात एक पुढाकार घेण्यात आला आहे.

मागील वर्षी या रनला सुरवात झाली होती त्यावेळी ५ हजार स्पर्धक धावले होते. मागील वर्षी ३ वर्ल्ड रेकॉर्डची नोंद झाली असुन यंदा या स्पर्धेचे हे दुसरे वर्ष आहे. १४ वर्षांवरील सर्वांसाठी ही स्पर्धा खुली आहे. (जीतोचे ६८ चैप्टर आणि २२ आंतरराष्ट्रीय चैप्टर) यांनी आपापल्या शहरातून रविवार, ३१ मार्च रोजी सकाळी ५.३० वाजता, ३ किमी, ५ किमी आणि १० किमी अहिंसा रन आयोजित करण्यात आल्याची माहिती जीतो नाशिकचे चेयरपर्सन अँड. सुबोध शहा, कल्पना पटणी, हर्षित पहाडे यांनी दिली. या अहिंसा रनचे नशिकचे स्थानिक मुख्य प्रायोजक ललित रुंगटा ग्रुप व् सहप्रायोजक ऋषभ इन्स्ट्रुमेंटस लिमिटेड आहेत. अहिंसा रन गोल्फ क्लब येथून सुरु होऊन ३ कि. मि. सिबल होटल, ५ कि.मी. एबीबी सर्कल, १० कि.मी. सातपुर अशा तिनही स्पर्धा रिटर्न गोल्फ क्लब येथे होणार आहे. स्वच्छ नाशिक, हरित नाशिकसाठी सर्व नाशिककरांनी अहिंसा रनमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन जीतो नाशिकच्या वतीने करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे ही 'अहिंसा रन' केवळ एका समुदायापुरती मर्यादित नसून जगभरातून अहिंसेच्या बाजूने असलेल्या लोकांना यात आमंत्रित करण्यात आले आहे. सर्व स्पर्धकांसाठी टी-शर्ट, मेडल आणि नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली आहे. यासंबंधीची अधिक माहिती सोशल मीडिया वेबसाइट रहळीर्रीप.ले आणि जीतो चॅप्टर, बिज़नेस बे, तिड़के कॉलनी येथे नोंदणी करता येईल. असे आवाहन संदिप पहाडे, वैशाली जैन, मीता मुथा, मनीषा चोपडा यांनी केले आहे.

होळी ते हनुमान जन्मोत्सवपर्यंत श्री हनुमान चालीसा पठण सोहळा

लासलगाव। लक्ष महाराष्ट्र वृत्त

गेल्या वर्षी शहरात होळी ते हनुमान जन्मोत्सव हनुमान चालीसा पठण कार्यक्रम विविध मंदिरांमध्ये आयोजित करण्यात आला होता त्याला भरघोस प्रतिसाद मिळाल्यानंतर सलग दुसऱ्या वर्षी देखील या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. नुकतेच आयोध्या येथे श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठेच्या मुहूर्तावर सुमारे ११ हजार भाविकांनी १ लाख हनुमान चालीसा पठण यशस्वी संपन्न केले होते.

रविवार (दि.२४) होळीच्या शुभमुहूर्तावर गणेश नगर येथील गणेश मंदिरात या हनुमान चालीसा पठाणचा शुभारंभ होणार आहे.सोमवार (दि २५) रोजी सर्वे नंबर ९३ ग्रामपंचायत पटांगण,मंगळवार (दि २६) रोजी लक्ष्मीनारायण मंदिर गोपाळकृष्ण मंदिर परिसर,शनिवार (दि ३०) रोजी श्री हनुमान मंदिर होळकरवाडी,मंगळवार (दि.२) एप्रिल रोजी दुर्गा माता मंदिर गणेश नगर,शुक्रवार (दि.५) रोजी ज्ञानेश्वर महाराज मंदिर,शनिवार (दि.६) रोजी क्रांती चौक श्रीराम नगर तर गुढीपाडव्याचे औचित्य साधून मंगळवार (दि.९) रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे हनुमान चालीसा पठण कार्यक्रम होणार आहे.

शनिवार (दि.१३ एप्रिल) रोजी हनुमान मंदिर ब्राह्मणगाव विंचूर,सोमवार (दि.१५) रोजी हनुमान मंदिर कोटमगाव,मंगळवार (दि.१६) रोजी इच्छापूर्ती गणेश मंदिर,श्रीराम जन्मोत्सवानिमित्त बुधवार (दि.१७) रोजी दुपारी ४ वाजता श्री बाबा अमरनाथ मंदिर एसटी डेपो लासलगाव,गुरुवार

(दि.१८) रोजी श्री काशी विश्वेश्वर मंदिर पिंपळगाव नजिक,शुक्रवार (दि.१९) रोजी यशवंत व सुमन नगर,शनिवार (दि.२०) रोजी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर विद्यानगर,रविवार (दि.२१) रोजी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर टाकळी विंचूर, सोमवार (दि.२२) रोजी श्री हनुमान मंदिर रेल्वे स्टेशन, व हनुमान जन्मोत्सव मंगळवार (दि २३) रोजी श्रीराम मंदिर लासलगाव येथे होणार आहे. सर्व कार्यक्रम हे रात्री ९ ते १० या वेळेत संपन्न होतील. लासलगाव व परिसरातील भाविकांनी या हनुमान चालीसा पठण सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

ऑलिंपियाड परीक्षेत सरस्वती विद्यामंदिर शाळेचे यश

लासलगाव। लक्ष महाराष्ट्र वृत्त

सन २०२३ -२४ या शैक्षणिक वर्षामध्ये सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशनच्या वतीने घेण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय गणित ऑलिंपियाड परीक्षेमध्ये सरस्वती विद्यामंदिर लासलगाव शाळेतून एकूण ७७ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.या परीक्षेमध्ये शालेय स्तरावर अवर्तन भंडारी,मनस्वी ठोंबरे,शिवराज पाटील, स्वराली चिंचोले, प्रथमेश राजोळे, दर्शन गवळी, अथर्व रसाळ, आर्या निकम, वेदांत कदम, रुद्र आहेर, चिन्मय भुले, अर्णव पातळे, मनस्वी गायकवाड, सुमित बनसोडे, शौर्य पाटील व ओमकार बोराडे या सोळा विद्यार्थ्यांना या परीक्षेमध्ये गोल्ड मेडल प्राप्त झाले .

या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अशोकनाना होळकर, अध्यक्ष जगदीश होळकर, उपाध्यक्ष सुलेमान मुलांनी, सचिव गुणवंत होळकर तसेच संचालक बाळासाहेब बोरसे, डॉ.विकास चांदर,संदीप होळकर यांनी कौतुक केले.या यशस्वी विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल व प्रमाणपत्र यांचे वितरण मुख्याध्यापक भीमराव शिंदे व शिक्षक वृंद यांनी केले. या यशस्वी विद्यार्थ्यांना ऑलिंपियाड प्रमुख मोहन नाईक यांनी मार्गदर्शन केले.या प्रसंगी सुनील आव्हाड, कैलास पातळे, संदीप सूर्यवंशी, नवनाथ जिरे, कांचन शेलार आदी उपस्थित होते.

जाहिर निवेदन

तमाम जनतेस या जाहिर निवेदना व्दारे कळविण्यात येते की, आमची संस्था श्री बालाजी मोठे संस्थान, बेटावद, ता. शिंदखेडा, जि. धुळे. नोंदणी क्रं.ओ/२०२/ धुळे या संस्थेचे संस्था नोंदणीचे मुळ प्रमाणपत्र, बदल अर्जाच्या प्रती, न्यास मिळकतीचे उतारे इ. कागदपत्रे असलेली स्वतंत्र पिशवी व इतर दप्तर हे धुळे येथे लेखापरिक्षणाचे कामा करीता मौजे बेटावद येथुन धुळे येथे येणेसाठी सकाळी ११:०० वाजता निघालो असता. मौजे बेटावद ते मौजे नरडाणा या दरम्यान वरील नमुद कागदपत्रे हि गहाळ झालेली आहे. सदरील वर नमुद कागदपत्रे हि कोणास मिळुन आल्यास, त्यांनी त्वरील खालील नमुद पत्त्यावर संपर्क साधावा.

येणेप्रमाणे जाहिर निवेदन असे.

धुळे

दिनांक : २०/३/२०२४

शिक्का

अध्यक्ष
श्री बालाजी मोठे संस्थान,
बेटावद, ता. शिंदखेडा, जि. धुळे.
श्री. प्रकाश दामु माळी
मौजे बेटावद, ता. शिंदखेडा, जि. धुळे

पौष्टिक समन्वय आणि बहुमुखी फायद्यांसह, आरोग्याला चालना देण्यासाठी पाम ऑइल बजावते महत्त्वपूर्ण भूमिका

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

-पाम ऑइल, एक बहुउपयोगी आणि मोठ्या प्रमाणावर वापरले जाणारे स्वयंपाकाचे ऑइल आहे, ज्याने केवळ स्वयंपाकासंबंधी वापरासाठीच नाही तर त्याच्या भरपूर पौष्टिक कंटेंटमुळे देखील ओळख मिळवली आहे. आपल्या आवडत्या पदार्थांची चव आणि टेक्सचर वाढवण्याव्यतिरिक्त, पाम ऑइलमध्ये पोषक तत्वांचे विशिष्ट मिश्रण असते जे सक्रियपणे संपूर्ण आरोग्यासाठी योगदान देते.पाम ऑइल त्याच्या संतुलित फॅटी ऍसिड रचनेसाठी प्रसिद्ध आहे,

ज्यामध्ये सॅच्युरेटेड आणि अनसॅच्युरेटेड फॅट्सचे मिश्रण समाविष्ट आहे. पाम ऑइलपासून मिळवलेल्या सॉलिड फॅट्सची निवड करणे हा एक आरोग्यदायी पर्याय आहे कारण ते हायड्रोजनेशन प्रक्रिया टाळते. तेलांच्या आंशिक हायड्रोजनेशनमुळे ट्रान्स फॅटी ऍसिडस् (टीएफए), सॅच्युरेटेड फॅटी ऍसिडस् आणि सीआयएस-फॅटी ऍसिडमध्ये बदल होऊ शकतात. असंख्य वैज्ञानिक अभ्यासांनी टीएफए आणि स्तनाचा कर्करोग, कोलोनिक कर्करोग आणि हृदयरोग यांसारख्या परिस्थितींमध्ये संबंध स्थापित केले आहेत. याव्यतिरिक्त, टीएफए हे टाईप २ मधुमेहाच्या प्रारंभाशी आणि नवजात बालकांच्या मेंदूवरील संभाव्य विकासात्मक परिणामांशी संबंधित असल्याचे मानले जाते.पाम ऑइल हे टोकोट्रिएनॉल्स आणि टोकोफेरॉल्सचे समृद्ध स्रोत म्हणून ओळखले जाते, जे एकत्रितपणे व्हिटॅमिन ई तयार करते.

याचा अर्थ असा होतो की पाम ऑइलमधील व्हिटॅमिन ई नैसर्गिक वृद्धत्वाची प्रक्रिया कमी करून काही जुनाट आजारांपासून संरक्षण करण्यासाठी योगदान देऊ शकते, तसेच शरीराच्या पेशींना ऑक्सिडेटिव्ह तणावापासून संरक्षण देते, रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते आणि त्वचेच्या आरोग्यास प्रोत्साहन देते. विशेषत:, पाम ऑइलमध्ये उपस्थित असलेल्या टोकोट्रिएनॉल्सने विविध आरोग्य अभ्यासांमध्ये आशादायक परिणाम दाखवले आहेत, जे संपूर्ण आहारात पाम ऑइचा समावेश करण्याचे संभाव्य फायदे अधोरेखित करतात.

पाम ऑइल मध्ये फॅटी ऍसिड आणि विविध फायटोन्यूट्रिएंट्स असल्यामुळे ते आरोग्यासाठी आवश्यक आहे. फॅटी ऍसिड शरीराच्या विविध भागांमध्ये पेशी पडदा तयार करण्यास मदत करतात, तर फायटोन्यूट्रिएंट्स आपल्या शरीराला अँटिऑक्सिडेंट आणि दाहक-विरोधी गुणधर्म प्रदान करतात. जर फॅट्स आणि तेलांचा पुरेशा प्रमाणात वापर केला गेला नाही तर त्यामुळे कुपोषण होऊ शकते आणि संसर्ग होण्याची शक्यता वाढते. अलीकडील प्रगतीमुळे पाम ऑइल मिलिंग दरम्यान निर्माण होणाऱ्या कचऱ्यापासून पाण्यात विरघळणारे अँटिऑक्सिडंट्स काढणे आणि एकाग्रता करणे शक्य झाले आहे. या कचऱ्यामध्ये फिनोलिक एसिड आणि फ्लेव्होनॉइड्सचे प्रमाण जास्त असते. या नैसर्गिक घटकांची उपस्थिती खाद्य आणि पोषण उद्योगांसाठी आव्हाने आणि संधी दोन्ही सादर करते.पाम ऑइलमधील मुबलक प्रमाणात असलेले सॅच्युरेटेड आणि मोनोअनसॅच्युरेटेड फॅटी ऍसिडचे रूपांतर सध्याच्या आहारातील मार्गदर्शक तत्त्वांशी जुळवून घेणाऱ्या फायद्यात झाले आहे, जे मार्जरीन, शॉर्टनिंग्ज आणि फ्राईंग फॅट्स सारख्या सॉलिड फॅट्समध्ये झिरो ट्रान्स फॅटचे समर्थन करतात. म्हणून इतर ऑइल आणि फॅट्ससह पाम ऑइल वापरल्याने, नवीन प्रकारच्या फॅट्स उत्पादनांची सुविधा देते जे नवीनतम आहार शिफारसींचे पालन करण्यासाठी समायोजित केले जाऊ शकते. पाम ऑइल, त्याच्या पौष्टिक समन्वय आणि बहुमुखी फायद्यांसह, एकंदर आरोग्याला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. एमपीओसी त्याच्या सु-संतुलित फॅटी ऍसिडस्, अँटिऑक्सिडंट्स, आणि प्रोविटामिन ए चे महत्त्व अधोरेखित करते. स्वयंपाकाच्या वापराव्यतिरिक्त, पाम ऑइलचा सकारात्मक प्रभाव दोन्ही पोषण आणि निरोगीपणा या फायद्यांमध्ये देखील दिसून येतो, जो निरोगी भविष्यासाठी एमपीओसी च्या समर्पणाशी जुळवून घेतो.

जाहिर नोटीस

तमाम जनतेस, सर्व हित संबंधीतांना तसेच सर्व वित्तीय संस्था, व स्थानीक स्वराज्य संस्था यांना या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकतीचे मालक श्रीमती चुन्नू सुनिल भंसाली रा. खोल गल्ली, ग.नं. ४, धुळे ता. जि. धुळे यांच्याशी आमचे अशिल यांनी खालील नमुद मिळकत कायमस्वरूपी विकत घेण्याचा सौदा केलेला असून लवकरच सदर खरेदीचा व्यवहार पुर्ण करणार आहे, सदर मिळकतीच्या टायटल व्हेरीफिकेशन हेतु सदर जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहे.

सदर मिळकतीबाबत कोणाचे काही हक्क हितसंबंध, तारण, गहाणखत, सौदा पावती, बोजा, मुखत्यारपत्र इतर काही हक्क, संबंध, अगर संकल्पीतव्यवहारास कोणत्याही प्रकारे हरकत वा विरोध असल्यास आवश्यक तया मुळ कागदपत्रासोबत ७ दिवासांच्या आंत नोटीस प्रसिध्दी पासुन खालील दिलेल्या पत्यावर कळवावे. परस्पर वर्तमान पत्रात घेतलेल्या हरकतीचा तसेच दस्तऐवजांशिवाय घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

नियोजीत मुदतीत कोणाचीही साधार व लेखी तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निर्बीज असुन तथाकथीत हक्क व अधिकार संबंधीतांनी सोडुन दिलेले असे समजुण सदर व्यवहार पुर्ण करण्यात येईल. या नंतर कोणीही काहीही तक्रार, हितसंबंध अगर हक्क दाखविल्यास ते आमचे आशिल आणि सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी, कळावे.

परिशिष्ट

मौजे वलवाडी ता. जि.धुळे येथील धुळे महानगर पालिका हद्दीतील बिनशेती रहिवासी प्रयोजनार्थ (N.A) १६७/१, १६७/२/३/४, १६८/१ अ पैकी प्लॉट नं. २७ एकुण क्षेत्र ८२.५० चौ.मी चा बखळ प्लॉट असुन यासी चतु:सिमा खालीलप्रमाणे.

त्यासी:-		मापे:-		चतु:सिमा:-
पुर्वेस	-	५.५ मी	-	अमिनिर्टी स्पेस
पश्चिमेस	-	५.५ मी	-	९ मी रस्ता
दक्षिणेस	-	१५ मी	-	प्लॉट नं. २८
उत्तरेस	-	१५ मी	-	प्लॉट नं. २६

येणेप्रमाणे जाहिर नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या माहिती व सांगितलेवरून त्यांचे तर्फे आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस असे.

धुळे

दिनांक: २१/०३/२०२४

ॲड. प्रविण भिमराव सिसोदे
७, दिघे ॲडव्होकेट चेबर्स,
धुळे जिल्हा कोर्टासमोर,
स्टेशन रोड,धुळे. ता.जि. धुळे
मो. नं. ७७९८३६११५५

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार श्री. ज्ञानेश्वर शिवाजी देवरे, रा. तरवाडे, ता. जि. धुळे यांनी श्री. अरविंद साहेबराव पाटील यांचे मालकीचे मौजे वलवाडी, ता. जि. धुळे येथील सर्व्हे नं. ९७/२/२ पैकी प्लॉट नं. ५१ चे एकुण क्षेत्र २२० चौ. मी. यापैकी पुर्वे कडील भागाचे क्षेत्र ११० चौ.मी. येणे प्रमाणे मिळकत खरेदी करणे हेतु एच.डी.एफ.सी. बँक लि., शाखा देवपुर, धुळे यांचेकडे कर्ज मंजूर करण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदरचे मालमत्तेचे श्री. अरविंद साहेबराव पाटील यांच्या खरेदीपुर्वी झालेले मालकी हस्तांतरणा बाबतचे म. दुय्यम निंबधक, धुळे यांचेकडे नोंदविलेले खरेदीखत व त्याची मुळ एस. आर. पावती गहाळ/ हरविले असल्याचे माझे पक्षकारांनी कळविले आहे, ते येणे प्रमाणे मा. दुय्यम निबंधक सो., धुळे यांचे कार्यालयात दिनांक २१/०३/२०११ रोजीचे दस्त क्रं. २१००/२०११ अन्वये नोंदणीकृत खरेदीखत व एस. आर. पावती.

सदरचे मुळ दस्त हे माझे पक्षकार घेत असलेल्या गृह कर्जा बाबत लिंक दस्ताऐवज असुन सदरचे दस्ताऐवज कोणासही मिळाली असल्यास त्याचा कोणीही गैरवापर करू नये तसेच सदरचे खरेदीखताची पावती कोणत्याही संस्थेकडे बॅन्केकडे किंवा इतर कोणाहीकडे तारण गहाण / नजर गहाण असल्यास किंवा त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा बोझा अथवा हितसंबंध असल्यास किंवा कोणालाही मिळून आल्यास किंवा कोणाचाही उजर आक्षेप असल्यास पुराव्याचे मुळ कागद पत्रांसह खालील पत्त्यावर ही नोटीस प्रकाशित झाल्याचे तारखेपासुन ७ दिवसांचे आत प्रत्यक्ष येऊन भेट घ्यावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकत / नोटीस आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच मुदतीनंतर कोणाची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सही पक्षकार

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्र, माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे

दिनांक: २१/०३/२०२४

ॲड. विजय म. मोरे
नोटरी-भारत सरकार
ऑफिस- बी/१२, भन्साली प्लॉझा,
नगरपट्टी, धुळे

न्यूज कॉलम

महिलांना किफायतशी शेळीपालन प्रशिक्षण

धुळे । महात्मा फुले कृषी विद्यापीठ कृषी विज्ञान केंद्र, धुळे व सेवा सहयोग संस्था, पुणे यांच्या माध्यमातून कृषी विज्ञान केंद्रात महिलांसाठी किफायतशीर शेळीपालन या विषयावर तीनदिवसीय प्रशिक्षण झाले. कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दिनेश नांद्रे, उद्यानवेत्ता प्रा. श्रीधर देसले, उद्यानवेत्ता डॉ. महेश गणापुरे, शास्त्रज्ञ जगदीश कथेपुरी आदी उपस्थित होते.

बल्हाणेत मतदान मतदान जनजागृती रॅली

धुळे । न्यू इंग्लिश स्कूल बल्हाणे विद्यालयाच्या वतीने बल्हाणे गावात मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली. सदर रॅलीसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक नानासो जी. व्ही. भामरे सर सर्व शिक्षक बंधू भगिनी शिक्षकेतर कर्मचारी व सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. तोच देश होईल महान, ज्या देशात १०० टकके होईल मतदान. अशा अनेक घोषवाक्य देऊन गावातील नागरिकांना मतदान करण्यासाठी प्रेरित करण्यात आले. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी गावातील सर्व नागरिकांना दिला.

बंद घराचे कुलूप तोडून चोरी

धुळे । तालुक्यातील कुसुंबा गावात बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी रोख रक्कम व ऐवज लांबवला. या घटनेत शॉर्ट पोत, चांदीची लक्ष्मीची मूर्ती, सोन्याचे टोंगल, चांदीची साखळी, ३० हजारांची रोकड असा एकूण ६९ हजार ७३ रुपयांचा ऐवज लांबवला. सकाळी हा प्रकार समोर आला. या प्रकरणी घरमालक राकेश देविदास जाधव यांच्या तक्रारीवरून धुळे तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास उपनिरीक्षक महादेव गुट्टे करीत आहे.

कुडाशी गावाजवळ १३ लाखांची अवैध दारु जप्त

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर परराज्यातून राज्यात अवैध दारुच्या वाहतुकीला ऊत आला आहे. त्या पार्श्वभुमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिक्षक स्वाती काकडे यांच्या मार्गदर्शनात सीमावर्ती भागात पाठलाग करुन दारुबंदी विभागाच्या पथकाने वाहनासह १३ लाखांची दारु जप्त केली आहे.

दारुबंदी खात्याचे साक्रीचेदुय्यम निरीक्षक बी.एस.चोथवे हे गुजरात राज्यालगत सिमावर्ती भागात गस्तीवर असताना एम.एच.१४ बी.सी. १९४० क्रमांकाच्या स्कॉर्पीओ मधून पिंपळनेरकडून नवापूरकडे गोवा राज्यात निर्मित दारूची वाहतूक होणार असल्याची खात्रीलायक बातमी त्यांना मिळाली या माहितीच्या आधारे मध्य रात्रीच्या वेळी पिंपळनेर-नवापूर रोडवरकुडाशी गावाजवळ रस्त्यावर सापळा रचला. संशयित स्कॉर्पिओला थांबविण्याच्या इशारा केला असता. तो न थांबता भरधाव वेगाने पळून जात असतांना सदर वाहनाचा चरणमाळ- रायपुर- नागझरी - खोकसा -उमरपाटा- चोरवड वारसा कळवा रोड. कळंबा गावाजवळ, कळंबा शिवार, ता. साक्री, जि. धुळे येथे अडविण्याच्या प्रयत्न केला असता सदर वाहनचालकाने सदर वाहन रस्त्याच्या कडेला उभे करून अंधाराचा फायदा घेऊन वाहनचालक पसार झाला. सदर वाहनाची तपासणी कली असता वाहना मध्ये ७ लाख २० हजार रुपये किंमतीची रॉयल ब्लू माल्ट विस्की (गोवा राज्यात निर्मित) १८० मी.लि. क्षमतेच्या एकूण ४८०० बाटल्या (१०० बॉक्स)आढळून आली.

सहा लाखाच्या स्कार्पिओसह १३ लाख २० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संशयित इसम व इतर फरार चालक, मालक तसेच जप्त मुद्देमाल देणार व घेणार यांच्या विरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंद झाला.

ही कारवाई दुय्यम निरीक्षक बी. एस. चोथवे, निरीक्षक डी.पी. नेहूल, दुय्यम निरीक्षक ए.सी. मानकर , पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे, एपीआय प्रकाश झोडगे, सचिन कापडणीस, गोरख पाटील, केतन जाधव, तसेच वाहनचालक रवींद्र देसले, यांचे पथकाने सदरची कारवाई केली असून पुढील तपास अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क श्रीमती स्वाती काकडे यांचेमार्गदर्शनाखाली दुय्यम निरीक्षक बी. एस. चोथव हे करीत आहेत. सिमालगत भागात गोवा राज्यात निर्मित विदेशी मद्याची साठा केला असल्याची दाट शक्यता असल्याने त्याबाबत माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागास देण्याचे आवाहन करण्यात येत असून माहिती देणार्याचे नाव गुप्त ठेवून त्यास योग्य ते बक्षीस देण्यात येईल. अवैधमद्य निर्मिती, वाहतूक व विक्री संदर्भात कोणतीही माहिती अथवा तक्रार आल्यास टोल फ्री क्र. १८००२३३९९९९ व व्हॉटसॲप नं ८४२२००११३३ तसेच दूरध्वनी क्र. ०२५६२-२९७४८४ या क्रमांकावर संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

गावठी हातभट्टी उध्वस्त

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तालुका पोलिसांनी अवैध धंद्यांविरुध्द मोहिम उघडली आहे. तालुका पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रमोद पाटील यांच्या सुचना व मार्गदर्शनावरुन पोलिस पथकाने कारवाया करतगावठीच्या हातभट्ट्या उध्वस्त केल्या आहेत. धुळे शहरापासून जवळच असलेल्या चितोड गावात काटेरी झुडूपांमध्ये गावठी हातभट्टी सुरु होती. तालुका पोलिसांच्या पथकाने छापा टाकून हातभट्टी व गावठी दारुची रसायने नष्ट केली.त्याबरोबरच चितोडगावा लगत असलेल्या धनगरवाडी येथे देखील छापा टाकून गावठी हातभट्टीची दारु नष्ट केली आहे. पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलिस अधीक्षक किशोर काळे, विभागीय पोलिस अधिकारी साजन सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका पोलिस ठाण्याचे पीआय प्रमोद पाटील यांच्या पथकातील पीएसआय राजश्री पाटील, पो.कॉ. दिवसे, रविंद्र सोनवणे, श्री कोकणी, एएसआय मोरे, जाधव यांनी ही कारवाई केली.

३० अंध विद्यार्थ्यांना प्रत्येकी १० हजार शिष्यवृत्ती प्रदान

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

चेन्नईच्या हेल्प द ब्लाइंड फाउंडेशन नाशिक शाखेच्या वतीने केटीएचएमच्या ३० अंध विद्यार्थ्यांना प्रत्येकी १० हजार रुपये शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मविप्र सरचिटणीस ड.नितीन ठाकरे होते. यावेळी बोलतांना ड.ठाकरे यांनी अंध विद्यार्थ्यांची इच्छाशक्ती प्रशंसनीय आहे, त्यांच्या जिद्दीला सलाम आहे असे सांगत भविष्यात अंध विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी संस्था कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर. डी. दरेकर यांनी केले. त्यांनी महाविद्यालयात असलेल्या अंध विद्यार्थ्यांसाठी सोयी सुविधा यांची माहिती दिली. नाशिक शाखेचे दत्ता कडवे यांनी त्यांच्या संस्थेची माहिती करून दिली. कार्यक्रमासाठी विठ्ठल सावकार, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. तुषार पाटील, प्रा. अमोल गायकवाड, डॉ. संतोष शेलार, शरद पिंगळे, मवाळ, लव्हाटे आदी उपस्थित होते. सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन डॉ. तुषार पाटील यांनी तर आभार डॉ. एन. डी. गायकवाड यांनी मानले.

चित्रकर्ती ज्योत्स्ना कदम यांच्या अमूर्त चित्रांचे आजपासून प्रदर्शन

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

मुंबईतील ख्यातनाम चित्रकर्ती ज्योत्स्ना कदम यांच्या अमूर्त शैलीतील चित्रांचे प्रदर्शन नाशिकमध्ये आयोजित करण्यात आले आहे. तिडके कॉलनीतील इंडेक्सआर्ट कलादालनात शुक्रवारी (दि.२२) चित्र -चिंतन या प्रदर्शनाचे उद्घाटन सकाळी ११ वाजता मान्यवरांच्या हस्ते होईल. या प्रदर्शनात कागदावर क्रलिक रंगात रंगवलेली सुमारे ३५ चित्रे मांडण्यात येणार आहेत.

सर्जनशील आणि चिंतनशील चित्रकर्ती ही ज्योत्स्ना कदम यांची ओळख आहे. याआधी अनेक वर्षांपूर्वी त्यांचे नाशिकला चित्रप्रदर्शन व प्रात्यक्षिक झाले होते. नासिक कलानिकेतनच्या चित्रस्पर्धेत त्यांनी पारितोषिकही पटकावले आहे. त्यांचा कला प्रवास निसर्ग व व्यक्तीचित्रणापासून सुरु झाला. नंतर त्या अमूर्त संकल्पना चित्रातून व्यक्त करायला लागल्या. चित्र - चिंतन या प्रदर्शनात त्यांनी रंगरेषेद्वारे विचार मांडले आहेत. हे चित्रप्रदर्शन दि.३१ पर्यंत दररोज सकाळी ११ ते सायंकाळी ७ पर्यंत कला रसिकांसाठी विनामूल्य खुले राहील. शनिवारी (दि.२३) त्यांची मुलाखत रेडिओ विश्वासचे सुसंवादक हरिभाऊ कुलकर्णी घेणार आहेत. सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रम होईल. यावेळी सुप्रसिध्द गायक प्रीतम नकील यांची शास्त्रीय गायन मैफल होणार आहे. सर्व कला रसिकांनी चित्रप्रदर्शन उद्घाटन समारंभाला व मुलाखत कार्यक्रमाला उपस्थित रहावे असे आवाहन इंडक्स आर्ट कलादालनाचे प्रमुख रुचिर पंचाक्षरी व कला समीक्षक स्नेहल तांबुलवाडीकर यांनी केले आहे.

वृक्षारोपण करून आंतरराष्ट्रीय जागतिक वनदिन साजरा

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

२१ जून जागतिक वन दिन म्हणून साजरा केला जातो. वनदिनाचे औचित्य साधून धुळे वनविभागातील चौगाव वन परिमंडळातील कुसुंबा बीटातील खेडे जिल्हा परिषद शाळा येथील विद्यार्थ्यांना वनविभागाचे कर्मचारी यांनी जल, जंगल, जमीन याविषयी माहिती देऊन मार्गदर्शन केले.

आपल्या जीवनात वृक्षांचे महत्व काय हे समजवण्यात आले. तापमान किती प्रमाणात वाढत आहे, कोरोना काळात ऑक्सिजन विना किती लोकांचा मृत्यू झाला, आपल्याला उन्हाळ्यात गाडी लावण्यासाठी झाडाची सावली शोधावी लागते. वृक्षारोपण करण्यासाठी सुद्धा लोकांना सांगावे लागते. जनजागृती करावी लागते अशी खंत वनविभागाचे नियतक्षेत्र अधिकारी डी. के. निकम यांनी व्यक्त केली. वातावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्ष लागवड खूप आवश्यक आहे. म्हणून जिल्हा परिषद शाळा आनंद खेडे येथे वृक्षारोपण करून जागतिक आंतरराष्ट्रीय वन दिन साजरा करण्यात आला. धुळे वनक्षेत्रपाल भूषण वाघ यांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाला वन परिमंडळ अधिकारी पी. ए. पाटील, नियतक्षेत्र अधिकारी डी के निकम, अधिसंख्य वनमजूर प्रकाश बोरसे, चौगाव परिमंडळ स्टॉप जिल्हा परिषद शाळा आनंद खेडे मुख्याध्यापक संजय परदेशी, हिरा अहिरे, रेखा शिंदे ,आशा ठाकूर, ज्योती परदेशी, चंद्रकांत शिंदे, मोरे, वाडेकर यांच्यासह विद्यार्थी विद्यार्थिनी कार्यक्रमाला उपस्थित होते.

कसबे सुकेण्यात अवैध दारू अड्ड्यावर छापा

ओझर । येथील पोलीस ठाणे हद्दीत असलेल्या कसबे सुकेणे येथील एका अवैध दारू अड्ड्यावर छापा टाकून ७७ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यात एका आरोपीस अटक करण्यात आली आहे.याबाबत सविस्तर वृत्त असे की कसबे सुकेणे भाऊसाहेब नगर रस्त्यावर एका बेदाण्याच्या शेडच्या जवळ पत्र्याच्या शेडमध्ये विना परवाना दारू विक्री होत असल्याची माहिती ग्रामीण पोलिसांना मिळाली. त्यानंतर बुधवारी रात्री सबंधित ठिकाणी छापा टाकत दारू, रोख रक्कम व वाहनासह ७७ हजारांचा मुद्देमाल जप्त करून ललित चिंतामण कर्डक यांस अटक करत कारवाई करण्यात आली.

हुतात्मा अनंत कान्हेरे मैदान परिसरात पर्यायी वाहनतळाची व्यवस्था करावी: प्रशांत जाधव

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानाच्या परिसरात पर्यायी वाहनतळाची व्यवस्था करण्यात यावी, यासकट या परिसरातील अनेक समस्यांबाबत नाशिक महापालिका आयुक्त यांना भारतीय जनता पार्टी नाशिक महानगराच्या वतीने निवेदन देण्यात आल्याची माहिती भाजपा नाशिक शहराध्यक्ष प्रशांत जाधव यांनी दिली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, हुतात्मा अनंत कान्हेरे मैदान येथील स्वच्छतागृहाची नियमित स्वच्छता होत नाही. त्यामुळे जॉगर्सला जॉगीग करतांना दुर्गंधीचा सामना करावा लागतो. त्यामुळे जॉगर्स प्रचंड संतापलेले आहेत. हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानात वाढत्या उन्हाळयात हवेने उडणारी धुळ नागरीकांच्या डोळयात व नाकात जाते त्यामुळे नियमित जॉगीग ट्रॅकवर पाणी मारण्यात यावे. जॉगीग ट्रॅकवर असलेले विविध प्रकारचे झाडे व फुल झाडे वाढत्या उन्हामुळे जळत आहेत तरी सकाळी व संध्याकाळी नियमित पाणी मारण्यात यावे. हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानात मोकाट कुत्र्यांचे प्रमाण फार मोठया प्रमाणात झाले आहे. त्यांचा बंदोबस्त करण्यात यावा..चालतांना महिला, मुले वयस्कर नागरीक यांना कुत्र्यांचा त्रास सहन करावा लागतो. हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानाच्या बाहेर जॉगर्स, व्यायाम करणाऱ्यांची वाहने गेट बाहेर पार्क केली जातात त्यामुळे तेथे ट्राफिकची समस्या भेडसावत आहे. त्याकरीता त्यांची जॉगीग ट्रॅकच्या उत्तर व दक्षिण गेटला पार्किंगची व्यवस्था करण्यात यावी. त्यामुळे पार्किंगसाठी सुसुत्रता येवून निर्माण होणारे अडथळे नियंत्रित होण्यास मदत होईल आदी मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत.

समृद्ध भारताचे स्वप्न पूर्ण करण्याची क्षमता राष्ट्रीय शिक्षण धोरणात : डॉ. पाटील

साक्री । लक्ष महाराष्ट्र वृत्त

समृद्ध भारताचे स्वप्न पूर्ण करण्याची क्षमता राष्ट्रीय शिक्षण धोरणात आहे.या धोरणाच्या अंमलबजावणीतून विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य गुणांची वृद्धी करून कुटुंबाप्रती,समाजाप्रती व राष्ट्राप्रतीच्या कर्तव्यपूर्तीची जाणीव निर्माण करण्याचे कार्य केले जाणार आहे असे मत कबचौ उमवि,जळगाव येथील मानव्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ जगदीश पाटील यांनी व्यक्त केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव आय.क्यू.ए.सी. व विद्या विकास मंडळाचे सिताराम गोविंद पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री च्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२०: थीम अँड प्रोस्पेक्टस या विषयावर प्राध्यापकांसाठी आयोजित एक दिवशीय चर्चासत्रात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे उद्घाटन कबचौ उमवि जळगाव व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ शिवाजी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे होते. प्रसंगी प्राचार्य डॉ एस पी गिरासे, प्राचार्य डॉ के डी कदम, प्राचार्य डॉ सुधाकर जाधव, प्राचार्य डॉ एस सी अहिरे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ अनंत पाटील उपस्थित होते.

एसव्हीकेएममध्ये रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

धुळे येथील एस.व्ही.के.एम. अभियांत्रिकी महाविद्यालयात रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात आला.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये रस्ता सुरक्षा विषयी जागृती निर्माण व्हावी या दृष्टीने धुळे प्रादेशिक परिवहन विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला सहायक मोटर वाहन निरीक्षक मोरेश्र्वर साखरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना वाहन चालविताना घ्यावयाची काळजी व नियम, अपघात झाल्यास काय करावे तसेच हेल्मेट वापरण्याचे महत्व विशद केले. त्यांनी परिवहन विभागाच्या संकेतस्थळावर जावुन लर्निंग लायसन कसे काढावे याविषयी सविस्तर माहिती दिली.

यावेळी सहायक मोटर वाहन निरीक्षक ऋषिकेश कुनगर यांनी विद्यार्थ्यांकडून रास्ता सुरक्षा नियम शपथ वाचून घेतली. कार्यक्रमाला सहायक मोटर वाहन निरीक्षक तुषार मोरे, प्राचार्य डॉ. निलेश साळुंके, डॉ. तुषार शिंदे, डॉ. मनोज सोनावणे, प्रा. चंदू कोळी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन मनोज सोनार यांनी केले.

खा. राहूल गांधींच्या दौऱ्यामुळे काँग्रेस पक्षात नवचैतन्य : डॉ. दरबारसिंग गिरासे

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

भारत जोडो न्याय यात्रेनिमित्ताने देशाचे नेते खा.राहूल गांधी यांच्या दौर्यामुळे काँग्रेस पक्षात नवचैतन्य निर्माण झाले असून कार्यकर्ते आणि पदाधिकार्यांमध्ये उत्साह संचारला आहे. महाराष्ट्र काँग्रेसचे कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाला धुळे जिल्हयात गतवैभव प्राप्त होणार असल्याची प्रतिक्रीया धुळे तालुका काँग्रेसचे अध्यक्ष डॉ. दरबारसिंग गिरासे यांनी दिली आहे.

धुळे तालुका काँग्रेसचे अध्यक्ष डॉ.दरबारसिंग गिरासे यांनी आपल्या प्रतिक्रीयेत म्हटले आहे कि, देशाचे नेते खा.राहूल गांधी यांच्या नेतृत्वाखाली धुळे जिल्हयात भारत जोडो न्याय यात्रा दि.१२ आणि १३ मार्च रोजी आगमन झाले होते. या दोन दिवसाच्या खा.राहूल गांधी यांच्या दौर्यामुळे काँग्रेस पक्षाला नवसंजीवनी मिळाली आहे. खा.राहूल गांधी यांच्या नेतृत्वाखालील भारत जोडो न्याय यात्रेला जिल्हयात प्रचंड प्रमाणात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्र काँग्रेसचे कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील यांचे नेतृत्व आणि मार्गदर्शनखाली झालेल्या महिला न्याय हक्क परिषदेला महिलाचा मिळालेला प्रतिसाद ऐतिहासिक होता. या महिला परिषदेत खा.राहूल गांधी यांनी नारी न्याय ग्यारंटी जाहिर केल्याने केंद्रात इंडीया आघाडीचे सरकार आल्यावर निश्चितच त्याची अंमलबजावणी होवून नारी शक्तीचे सक्षमीकरण व सबलीकरण होणार आहे. केंद्रातील व राज्यातील सरकारबद्दल जनेतेमध्ये प्रचंड रोष आहे. वाढती महागाई घरगुती गॅस, पेट्रोल, डिझेलचे वाढणारे भाव यामुळे जनता होरपळून निघाली आहे. युवकांना नोकरी आणि उद्योग व्यवसाय नसल्याने बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे भाजपा सरकारविषयी युवकांमध्ये संताप आहे. शेतकर्यांच्या शेतीमालाला भाव नाही. कांदा आणि कपाशी मातीमोल भावाने विकावी लागली आहे. दुष्काळ आणि नैसर्गिक संकटाने शेतकरी हवालदिल झाला असून कर्जबाजारी झाला आहे. त्यामुळे राज्य व केंद्रातील सरकारबद्दल शेतकर्यांमध्येही नाराजी आहे. त्यामुळे देशात इंडीया आघाडी आणि राज्यात महाविकास आघाडीला जनतेकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. खा.राहूल गांधी यांच्या दौर्यामुळे काँग्रेस पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह संचारला आहे. त्यामुळे होऊ घातलेल्या लोकसभा निवडणूकीत काँग्रेस पक्षाचाच खासदार निवडून येईल असा विश्वास तालुकाध्यक्ष डॉ.दरबारसिंग गिरासे यांनी व्यक्त केला आहे. लोकसभेसह येणार्या विधानसभेतही इंडीया आघाडी आणि महाविकास आघाडीचा विजय निश्चित असल्याचे त्यांनी सांगितले.

मतदानाचा टक्कावाढीसाठी प्रयत्न

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

लोकसभेच्या निवडणुकीत देशाच्या स्वातंत्र्यापासून धुळे शहर विधानसभा मतदारसंघात ५० टक्क्यांहून अधिक मतदान होऊ शकलेले नाही. किंबहुना, गेल्या निवडणुकीवेळी सरासरी २९ टक्केच मतदान झाले. त्यामुळे होऊ घातलेल्या या निवडणुकीत लोकसहभागासह जनजागृतीतून मतदानाचा टक्कावाढीचे कसोशीने प्रयत्न होतील. शहर मतदारसंघात आचारसंहितेचे पालन, केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विविध कक्षांसह सेवा कार्यान्वित झाली असून, उपाययोजनांचा चौकसतेने अंमलहोण्यासाठी पथकांची नियुक्ती केल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी सीमा अहिरे यांनी दिली.

धुळे शहर विधानसभा मतदारसंघातील उपाययोजना आणि सेवांसंदर्भात अपर तहसील कार्यालयात पत्रकार परिषद झाली. तीत भूसंपादन उपजिल्हाधिकारी सीमा अहिरे, अपर तहसीलदार वैशाली हिंगे यांनी लोकसभा निवडणुकीसंदर्भात तयारीची माहिती दिली. लोकसभेच्या धुळे मतदारसंघात पाचव्या टप्प्यात २० मेस निवडणूक होत आहे. या अनुषंगाने निवडणुकीची तयारी सुरू आहे.